**केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान**
**शिर्डी शहराच्या पाणी पुरवठा प्रकल्पातील सौरऊर्जा उपांगास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- अमृत-२०१९/प्र.क्र.२३८(२)/नवि-३३**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
**दिनांक:- २९ ऑगस्ट, २०१९**

**वाचा:-**

१. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांक अमृत-२०१५/प्र.क्र.१९७(३)/नवि-३३, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५
२. शासन निर्णय क्रमांक अमृत-२०१७/प्र.क्र.२७/नवि-३३, दिनांक ०८ फेब्रुवारी, २०१७ व दिनांक १९ एप्रिल, २०१७
३. शासन निर्णय क्रमांक अमृत-२०१९/ प्र.क्र. २८९/ नवि-३३, दिनांक १७ डिसेंबर, २०१८

**प्रस्तावना :-**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत संदर्भाधीन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये शिर्डी शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पातील सौरऊर्जा उपांगाचे काम मेडामार्फत पूर्ण ठेव तत्वावर राबविण्याचा निर्णय शासनाने संदर्भाधीन क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये घेतलेला आहे.

त्यानुसार अमृत अभियानांतर्गत मंजूर शिर्डी शहर पाणीपुरवठा योजनेतील सौरऊर्जा उपांगाचा डीपीआर हा मेडामार्फत तयार करून तांत्रिक मान्यता प्रदान करून शासनाकडे मान्यतेस सादर करण्यात आला होता. त्यानुसार मेडामार्फत सादर करण्यात आलेल्या सौरऊर्जा प्रकल्पाच्या डीपीआरला संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच, अमृत अभियानांतर्गत गठीत राज्यस्तरीय तांत्रिक समितीने मान्यता दिली आहे. त्यानुसार, केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत मंजूर शिर्डी शहर पाणीपुरवठा योजनेतील सौरऊर्जा प्रकल्पाच्या उपांगास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या मंजूर आराखडयातील शिर्डी शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पाच्या दिनांक १९ एप्रिल, २०१७ च्या प्रशासकीय मान्यता आदेशातील परिच्छेद क्रमांक १ मधील तांत्रिक उपांगांच्या विवरणपत्रामध्ये अ.क्र. ५ मध्ये खालीलप्रमाणे सौरऊर्जा उपांगाच्या किंमतीस मान्यता प्रदान करण्यात आली होती.

| Sr. No. | Description | Amount (Rs.) |
|---|---|---|
| 5 | Solar Panel arrangements Etc | 2,53,65,807 |

२. सदर शासन निर्णयाच्या प्रस्तावनेमध्ये नमूद केलेनुसार, शिर्डी शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पातील मेडामार्फत तयार करण्यात आलेल्या सौरऊर्जा उपांगाच्या डीपीआरला आता शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या मंजूर आराखडयातील शिर्डी शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पाच्या दिनांक १९ एप्रिल, २०१७ च्या प्रशासकीय मान्यता आदेशातील परिच्छेद क्रमांक १ मधील तांत्रिक उपांगांच्या विवरणपत्रामध्ये अ.क्र. ५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| Sr. No. | Description | Amount (Rs ) |
|---|---|---|
| 5 | Solar Power Plant 500 kWp | 2,33,00,000 |

**०३.** सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद विवरणपत्रानुसार अमृत अभियानांतर्गत मंजूर शिर्डी शहर पाणीपुरवठा योजनेतील रु. २,३३,००,०००/- (रुपये दोन कोटी, तेहतीस लक्ष फक्त) किंमतीच्या सौरऊर्जा उपांगास खालीलप्रमाणे अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सदर उपांगाचे काम महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (मेडा) मार्फत पूर्ण ठेव तत्वावर राबविण्यात यावे.
२. सदर प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित झाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबविणे, त्याची छाननी करणे, कार्यादेश देणे तसेच सदर प्रकल्प राबविण्याबाबतची पुढील कार्यवाही महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरणाने (मेडा) करावी. सदर प्रकल्पाचे काम संबंधित निविदाकाराकडून दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ पूर्वी पूर्ण करून कार्यान्वित करावा.
३. त्यानुसार सदर प्रकल्पाच्या निविदा ७ दिवसांत प्रसिध्द करणे व याबाबतची निविदा प्रक्रिया पूर्ण करून तात्काळ कार्यादेश देणे मेडावर बंधनकारक राहील.
४. याबाबतच्या कामाचे कार्यादेश दिल्यानंतर त्याबाबतचा निधी प्रकल्प निधीतून संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरणाकडे (मेडा) वर्ग करावा.
५. सदर उपांगाच्या पूर्ण ठेव तत्वावर अंमलबजावणीपोटी महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरणास (मेडा) ३ टक्के इतके शुल्क संदर्भाधीन क्रमांक ३ मध्ये नमूद शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या कामाच्या टप्प्यानुसार **स्वनिधीतून** अदा करणे संबंधित नागरी स्थानिक संस्थेवर बंधनकारक राहील.
६. संदर्भाधीन क्रमांक ३ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेनुसार प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर किमान १ वर्षासाठी कार्यान्वयनावर पर्यवेक्षण करून प्रकल्प नागरी स्थानिक संस्थेस हस्तांतरीत करणे मेडावर बंधनकारक राहील.
७. सदर सौरऊर्जा प्रकल्पाच्या मेडामार्फत तयार करण्यात आलेला डीपीआरमधील प्रस्तावित जागा व क्षमता याला नागरी स्थानिक संस्थेची मान्यता असून त्यासाठी आवश्यक जागा नागरी स्थानिक संस्थेच्या ताब्यात असलेबाबत सहमती नागरी स्थानिक स्वराज संस्थेने शासनाकडे कळविली आहे. त्यानुसार आवश्यक ती सर्व कार्यवाही नागरी स्थानिक संस्थेने करावी.
८. केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत मंजूर शिर्डी पाणीपुरवठा प्रकल्पातील सौरऊर्जा उपांगाच्या सुधारीत किंमतीनुसार प्रकल्पाच्या प्रशासकीय मंजूर किंमतीत झालेल्या सुधारणेनुसार त्याप्रमाणे

वित्तिय आकृतीबंधामध्ये झालेल्या सुधारणेनुसार सदर प्रकल्पास केंद्र व राज्य शासनाचा निधी वितरीत करण्यात येईल.

९. सदर प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीदरम्यान सदर प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाल्यास, त्याचे दायित्व हे संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे राहील. यासाठी शासनाकडून कोणतेही अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

१०. संदर्भाधीन क्रमांक ३ च्या शासन निर्णयामध्ये नमूद सर्व अटी व शर्ती या संबंधित नागरी स्थानिक संस्था व मेडा यांना बंधनकारक राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२९१७३२४९५८२५ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=300d785e12fdc19db0612f1ffdf83e54efe7da2b1bc63d18df8e09b3c7eece65, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2019.08.30 12:17:26 +05'30'

**(पां.जो.जाधव)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा .मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव.
३. मा.राज्यमंत्री नगरविकास विभाग यांचे खाजगी सचिव
४. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक
५. अप्पर मुख्य सचिव,नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक
६. अप्पर मुख्य सचिव,पाणीपुरवठा विभाग यांचे स्वीय सहायक
७. प्रधान सचिव,नगरविकास विभाग (२) यांचे स्वीय सहायक
८. प्रधान सचिव (ऊर्जा), उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई.
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.
१०. आयुक्त तथा संचालक ,नगरपरिषद प्रशासन संचालनालय ,मुंबई.
११. महांसचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (MEDA), मुंबई.
१२. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
१३. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, मुंबई.
१४. जिल्हाधिकारी, अहमदनगर
१५. जिल्हा प्रशासन अधिकारी, अहमदनगर
१६. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, जि. अहमदनगर
१७. निवडनस्ती, नवि-३३.